पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. एन.एस.के./ ५५/२०२४-२६ आर.एन.आय. नंबर : १८९१८/१९७०.

पावसाचा खेळ; शेवटचा साखळी सामना रद्द

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धा : उपांत्य फेरीत भारताची गाठ ऑस्ट्रेलियाशी

नवी मुंबई । वृत्तसंस्था

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत वारंवार पावसाचा व्यत्यय येत आहे. अनेक लढती त्यामुळे रद्द कराव्या लागल्या. रविवारी येथे डी. वाय. पाटील स्टेडियमवर भारत आणि बांगलादेश यांच्यात खेळवल्या गेलेल्या अखेरच्या साखळी सामन्यालाही पावसाचा फटका बसला. त्यामुळे हा सामना रद्द करण्यात येऊन दोन्ही संघांना एकेक गुण देण्यात आले. भारतीय संघाने आधीच उपांत्य फेरी गाठली आहे. त्यामुळे या सामन्याचा भारतीय संघाला काहीही फटका बसला नाही. येत्या ३० ऑक्टोबरला नवी मुंबईत होणाऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताची गाठ ऑस्ट्रेलियाशी पडणार आहे. या दिवशी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

पावसाच्या व्यत्ययामुळे भारत-बांगलादेश यांच्यातील सामना ४३-४३ षटकांचा करण्यात आला होता. नंतर पुन्हा पावसाची बाधा आल्याने हा सामना २७-२७ षटकांचा करण्यात आला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २७ षटकांत ९ बाद ११९ धावा केल्या होत्या. मात्र, डकवर्थ लुईस नियमानुसार भारताला १२६ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आले होते. लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने ८.४ षटकांत बिनबाद ५७ धावा केल्या असताना पुन्हा पावसाचा व्यत्यय आला. त्यामुळे सामना थांबवण्यात आला. पावसाचा जोर वाढल्याने पंच आणि सामानाधिकाऱ्यानी हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. भारताकडून स्मृती मानधनाने नाबाद ३४ धावा केल्या. अमनज्योत कौरने १५ धावा केल्या. या सामन्यादरम्यान प्रतिका रावलला क्षेत्ररक्षण करताना दुखापत झाली. त्यामुळे भारतासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

इंग्लंडची न्यूझीलंडवर आठ गडी राखून मात

विशाखापट्टणम । वृत्तसंस्था

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये रविवारी न्यूझीलंडचा इंग्लंडने आठ गडी राखून दणदणीत विजय करून ११ गुणांची कमाई करत गुणतालिकेत दुसरा क्रमांक पटकावला.

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ३८.२ षटकांत सर्वबाद १६८ धावा केल्या. संघाची सुरुवात खराब झाली. सुझी बेट्स १० धावा काढून बाद झाली. त्यानंतर जॉर्जिया प्लीमेरने ॲमेलिया केरला साथ दिली. सोफी डिवाईनने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. सोफी २३, इसाबेल गेझ १४ जेस केर १० धावा काढून बाद झाल्या. इंग्लंडकडून लेन्सी स्मिथने तीन तसेच नॅट सेवियर ब्रंट आणि ॲलिस कॅपसीने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

इंग्लंड संघाला ॲमी जोन्स आणि टॅमी ब्यूमॉंटने दमदार सुरुवात करून दिली. पहिल्या विकेटसाठी त्यांनी ७५ धावांची भागीदारी रचली. दोन्ही फलंदाजांनी संघाची धावसंख्या १५० पार नेली. ॲमी जोन्स सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरली.

थोडक्यात

आज जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा

नाशिक । येथील मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलात आज (दि.२७) वरिष्ठ व वयस्क गटाच्या पुरुष आणि महिला जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा तसेच निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० वाजता स्पर्धेला प्रारंभ होईल. नाशिक जिल्हा टेनिस, व्हॉलीबॉल असोसिएशनने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे खेळाडूंची जिल्हा संघासाठी निवड केली जाणार आहे. निवडलेले खेळाडू दि.१ व २ नोव्हेंबरला हिंगोली येथे होणाऱ्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर जिल्हा स्पर्धेत सहभागी होतील. स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवहान जिल्हा टेनिस, व्हॉलीबॉल असोसिएशनने केले आहे.

न्यूझीलंड विजयी

हॅमिल्टन । न्यूझीलंड व इंग्लंड यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेच्या पहिल्या सामन्यात माऊंट मांगुनाई येथील बे ओव्हल स्टेडियमवर यजमान न्यूझीलंडने चार गडी राखून विजय संपादन करत विजयी सलामी दिली आहे. मालिकेतील दुसरा सामना हॅमिल्टन येथील सेडन पार्क स्टेडियमवर बुधवारी (दि. २९) खेळविण्यात येणार आहे. मालिकेत आपले आव्हान कायम राखण्यासाठी इंग्लंड संघाला विजय अनिवार्य असणार आहे.

सोफी वन डेतून निवृत्त

विशाखापट्टणम। न्यूझीलंड महिला क्रिकेट संघाची अष्टपैलू खेळाडू आणि कर्णधार सोफी डिवाईनने वन डेतून निवृत्ती घेतली. विश्वचषक स्पर्धेमध्ये रविवारी विशाखापट्टणम येथील वाय.एस. राजशेखर रेड्डी स्टेडियमवर खेळविण्यात आलेल्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध आठ गडी राखून पराभव स्वीकारावा लागल्यानंतर तिला अश्रू अनावर झाले. सामन्यापूर्वी तिला गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. सोफी न्यूझीलंड संघाची सर्वात यशस्वी खेळाडू असून तिने १५८ सामने खेळले आहेत. चार हजार धावा केल्या असून शंभर बळी घेतले आहेत. तिने कर्णधार म्हणून न्यूझीलंड संघाला एक नवी ओळख दिली. शांत स्वभाव आणि अष्टपैलू खेळामुळे अनेक युवा खेळाडूंना प्रेरित केले. तिने १९ वर्षे न्यूझीलंड संघाचे प्रतिनिधित्व केले.

श्रेयसला झेल महागात; तीन आठवडे मैदानाबाहेर

सिडनी । वृत्तसंस्था

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात क्षेत्ररक्षण करताना भारताचा उपकर्णधार श्रेयस अय्यरला ॲलेक्स कॅरीचा कॅच घेताना गंभीर दुखापत झाली. यामुळे आता तो तब्बल तीन आठवडे क्रिकेटपासून दूर राहणार आहे. त्यामुळे टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे.

श्रेयसच्या दुखापतीबाबत बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, श्रेयसच्या बरगडीचे फ्रॅक्चर झाले असून आता त्याला किमान तीन आठवडे विश्रांती घ्यावी लागेल. त्यानंतर पुढील चाचण्या केल्या जातील. कदाचित त्याला आणखी विश्रांती घ्यावी लागू शकतो. श्रेयस ३० नोव्हेंबर रोजी रांची येथे होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात खेळण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. सूत्रांनी सांगितले की, त्याला दुखापतीतून सावरण्यास चार आठवडे लागले तर त्याला मैदानात उतरणे कठीण होऊ शकते.

तिसऱ्या सामन्यात हर्षित राणाच्या चेंडूवर ॲलेक्स कॅरीचा झेल बॅकवर्ड पॉइंटवर असलेल्या अय्यरने घेतला, मात्र तो जमिनीवर पडला. यात त्याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली.

रोहित म्हणतो, सायनिंग ऑफ फ्रॉम सिडनी!

सिडनी । वृत्तसंस्था

रोहित शर्माने सोशल मीडियावर सिडनी विमानतळावरील डिपार्चरचा फोटो शेअर करत, त्याला 'वन लास्ट टाइम, सायनिंग ऑफ फ्रॉम सिडनी', असे कॅप्शन दिले आहे. रोहितने यात निवृत्तीबाबत कोणतेही संकेत दिलेले नाहीत. मात्र, हा त्याचा शेवटचा ऑस्ट्रेलिया दौरा असल्याचे सूचित केले आहे.

टीम इंडियाची अनुभवी जोडी रोहित शर्मा आणि विराट कोहली त्यांच्या कारकीर्दीतील अखेरच्या टप्प्यात आहेत. दोघेही टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाले आहेत. विराट आणि रोहितचा हा शेवटचा ऑस्ट्रेलिया दौरा असल्याची चर्चा होती. त्यामुळे रोहित आणि विराटला ऑस्ट्रेलियात अखेरचे खेळताना पाहण्यासाठी चाहत्यांनी शनिवारी (दि. २५) सिडनीतील तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात मोठी गर्दी केली होती. रोहित आणि विराटनेही चाहत्यांची निराशा केली नाही. रोहित-विराटने विजयी खेळी केली. टीम इंडियाला अंतिम सामन्यात विजयी करून भारताची लाज राखली. भारताने सलग दोन सामन्यांसह मालिका गमावली. त्यामुळे भारतासमोर तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात क्लिन स्वीप टाळण्याचे आव्हान होते. भारताच्या गोलंदाजांनी कांगारुंना २३६ धावांमध्ये रोखले. त्यानंतर भारताने ३८.३ षटकांत केवळ एक विकेट गमावून विजयी लक्ष्य गाठले.

रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी जोडीने भारताला विजयी करण्यात प्रमुख भूमिका बजावली. शुभमन आऊट झाल्यानंतर विराट रोहितची साथ देण्यासाठी मैदानात आला. या जोडीनेच फटकेबाजी करत भारताला विजयापर्यंत पोहचवले. त्यांनी बिनबाद १६८ धावांची भागीदारी केली. रोहितने नाबाद १२१ धावा केल्या. तर विराटने ८१ चेंडूत ७४ धावांची खेळी केली.

विजयदिनानिमित्त दिल्लीत सायकल रॅली

'हिंदायान' संस्थेचे खासदारांना निमंत्रण

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

तंदुरुस्ती, शाश्वतता प्रगती आणि राष्ट्राभिमानाचा संगम साधत 'हिंदायान' संस्थेने संसद भवन ते राष्ट्रीय युद्धस्मारका दरम्यान निघणाऱ्या प्रतीकात्मक सायकल रॅलीत सहभागी होण्यासाठी खासदारांना निमंत्रित केले आहे. ही सायकल यात्रा पुढील महिन्यांत दि.३० नोव्हेंबरला विजयदिनानिमित्त आयोजित करण्यात आली आहे.

१९७१ च्या भारत-पाक युद्धातील भारतीय सशस्त्र दलांच्या विजयाच्या स्मरणार्थ आणि बांगलादेश मुक्तीसाठी झालेल्या ऐतिहासिक लढ्याच्या गौरवासाठी, क्रीडा व युवक व्यवहार मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने ही १० कि.मी. 'हिंदायान' सायकल परेड आयोजित करण्यात आली आहे. परेडची सुरुवात चाणक्यपुरीतील नॅशनल यूथ हॉस्टेल येथून होईल. समारोप इंडिया गेटलगत राष्ट्रीय युद्धस्मारकात होणार आहे.

पंतप्रधान मोदी यांनी उद्घाटन केलेल्या 'फिट इंडिया मिशन'अंतर्गत 'संडे ऑन सायकल' या उपक्रमाचा भाग आहे. दरवर्षी भारतीय सेना, नौदल, वायुदल आणि टेरिटोरियल आर्मी हिंदायान सायकल मोहिमेत सक्रियपणे सहभागी होतात, असे 'हिंदायान'चे संयोजक व जगप्रदक्षिणा करणारे पहिले भारतीय विष्णुदास चापके म्हणाले. या वर्षी कर्तव्य पथावरील सायकल परेडसाठी बीएसएफ, सीआरपीएफ, एसएसबी, आयटीबीपी आणि आसाम रायफल्स यांचा सहभाग असणार आहे.

एनआयए, एनसीबी, एनएसजी आणि सीआयएसएफ यांनीही त्यांच्या अधिकाऱ्यांकडे मान्यता प्रक्रियेची फाईल पाठवली आहे. राज्यसभा व लोकसभेच्या सदस्यांना सहभागी होण्यासाठी ई-मेल आमंत्रण दिले आहे. जे सदस्य सायकल राईड करू शकत नाहीत, त्यांना राष्ट्रीय युद्धस्मारकावर उपस्थित राहून वीर शहीदांना अभिवादन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. १९९० आधी सायकल हे प्रतिष्ठेचे प्रतीक होते.

लाडक्या बहिणींना 'भाऊबीज' मिळतच राहील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुन्हा ग्वाही

सातारा । वृत्तसंस्था

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' बंद होणार, असे काही लोक सातत्याने सांगतात. मात्र जोपर्यंत देवाभाऊ आहे, शिंदे साहेब आहेत, अजितदादा आहेत, तोपर्यंत ही योजना आम्ही कधीच बंद होऊ देणार नाही. आमच्या लाडक्या बहिणींना ही दिवाळीची 'भाऊबीज' आहे. ती सातत्याने मिळत राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा दिली.

फलटण येथील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून दरमहा राज्यातील पात्र लाभार्थी महिलांना १,५०० रुपये त्यांच्या बँक खात्यावर जमा केले जातात. दिवाळी होऊन गेली आहे. ऑक्टोबरचे १,५०० रुपये कधी मिळणार? याकडे राज्यातील लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे. अशावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या योजनेबाबत विश्वास व्यक्त करून लाभार्थी महिलांना दिलासा दिला आहे.

आपले महायुतीचे सरकार हे विकासाचा विचार करणारे सरकार आहे. आम्हाला समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास हवा आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील दुष्काळ आम्हाला दूर करायचा आहे. आमच्या शेतकऱ्यांना मदत करायची आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर संकट आल्यानंतर आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठे ३२ हजार कोटी रुपयांचे मदतीचे पॅकेज आम्ही शेतकऱ्यांना दिले. आता शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीचे पैसे जमा होण्यास सुरूवातही झाली आहे. आम्ही सुरु केलेल्या योजना कोणत्याही परिस्थितीत कधीच बंद होऊ देणार नाही, असेही फडणवीस म्हणाले.

आम्ही शेतकऱ्यांना वीज बिलात सवलत दिली आहे. विजेचे बिल माफ केले आहे. पाच वर्षे आमच्या शेतकऱ्यांना विजेचे कोणतेही बिल भरावे लागणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले. पाच वर्षांनी तुम्ही आमचे कॉन्ट्रॅक्ट रिन्यू केला तर अजून पाच वर्षापर्यंत तुम्हाला सवलत देऊ, असे फडणवीस म्हणाले.

आतातरी पाच वर्षापर्यंत वीज सवलत ठेवली आहे. सौरऊर्जाकरण करतोय. त्यानंतर २०२६ च्या डिसेंबरमध्ये काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना ३६५ दिवस, दिवसा १२ तास वीज आणि तिही वीज दिल्याशिवाय राहणार नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

शक्तिपीठ महामार्गासाठी पैसे, पण शेतकऱ्यांसाठी नाहीत

सुप्रिया सुळेंचा राज्य सरकारवर हल्लाबोल

संगमनेर । वृत्तसंस्था

शेतकऱ्यांना मदत न करता केवळ पाहणी दौरे करणाऱ्या सरकारवर खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार निशाणा साधला. शक्तिपीठ महामार्गासाठी सरकारकडे पैसे आहेत, पण शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी पैसा नाही. महाराष्ट्रातील ही लाजिरवाणी परिस्थिती आहे, असा घणाघात सुळे यांनी केला.

संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात सुप्रिया सुळे बोलत होत्या. आज कांद्याला भाव नाही. एखादेही पीक फायदेशीर नाही. शरद पवार मंत्री असताना शेतमालाचे भाव पडू दिले नाहीत, पण या सरकारच्या काळात एकाही पिकाला भाव नाही. सरकार म्हणते 'दिवाळी गोड करू', पण कोणाची दिवाळी गोड झाली? तुमची असेल, कारण तुम्हाला शक्तिपीठ महामार्ग करायचा आहे, असे सुळे म्हणाल्या.

अहिल्यानगर जिल्ह्यात काही जणांचे आमच्यावर फार प्रेम आहे, असे सांगत सुळे यांनी अप्रत्यक्षपणे राधाकृष्ण विखे-पाटील यांना टोला लगावला. काही लोक फक्त बोलत राहतात, पण आम्ही साईबाबांचा 'श्रद्धा आणि सबुरी'चा मंत्र जोपासला आहे. वेळ येईल. फक्त सबुरी ठेवा, असे सुळे यांनी सांगितले.

सरकारचे मंत्री फक्त पाहणीसाठी फिरतात. जलजीवन मिशनची कामे अपूर्ण आहेत. अनेक ठिकाणी पाइपलाइन फुटल्या आहेत. आम्ही केंद्राकडे तक्रार करून चौकशी लावली आहे. सत्ता मिरवण्यासाठी नव्हे तर जनतेच्या आयुष्यात बदल करण्यासाठी असते, असा टोला त्यांनी लगावला.

सरकारला स्वस्थ बसू देणार नाही

सरसकट कर्जमाफी होत नाही तोपर्यंत आम्ही सरकारला स्वास्थ बसू देणार नाही, असा इशारा सुप्रिया सुळे यांनी दिला. सुळे यांनी दिवंगत आर. आर. पाटील यांच्या आठवणी जागवल्या. महिलांना सत्तेत स्थान देऊन खरा सन्मान कसा केला ते सांगितले. संग्राम जगताप यांच्या प्रक्षोभक वक्तव्याचा उल्लेख करताना त्यांनी इशारा दिला. माझ्या मतदारसंघात येऊन कोणी अशी विषारी भाषा वापरली तर त्याला येऊ देणार नाही, असे सुळे यांनी सूचित केले.

शेतीत विदेशी हस्तक्षेप अमान्य

जो तुमच्या सुख-दुःखात असतो, त्यालाच मत द्या. आम्ही शेतीत अमेरिकेला येऊ दिले नाही. या सरकारने तसे काही केले तर आम्ही विरोध करू. शेतीतील कोणत्याही निर्णयात विदेशी हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, असा इशारा सुळे यांनी केंद्र सरकारला दिला. राज्यात अनेक प्रश्न आहेत, पण काही नेते फक्त तेढ निर्माण करण्याचे काम करीत आहेत. २०२९ मध्ये जनता अशा लोकांना घरात बसवेल, असेही सुळे म्हणाल्या.

रील बनवण्याच्या नादात दोघांचा मृत्यू

जळगाव । प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्यातील सुरत-भुसावळ मार्गावर पाळधी स्थानकानजीक रील बनविण्याच्या नादात दोन समवयस्क तरुणांचा धावत्या रेल्वेखाली आल्याने मृत्यू झाला. ही घटना रविवारी सकाळी ११ च्या सुमारास घडली.

प्रशांत पवन सैरनार (१८) आणि हर्षवर्धन महेंद्र नन्नवरे (१८) दोन्ही रा. महात्मा फुले नगर, पाळधी, जिम), अशी अपपातातील मृत तरूणांची नावे आहेत. दोघेही रविवारची सुटी असल्याने पाळधी स्थानकापासून जवळच असलेल्या पथराड गावाकडील गेटलगत सकाळी ११ वाजेच्या सुमारास रेल्वे मार्गावर धोकादायक पद्धतीने रील बनविण्याचा प्रयत्न करत होते. त्याच वेळी नेमकी धरणगावकडून जळगावच्या दिशेने जाणारी अहमदाबाद-हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेस आली. कानाला हेड फोन हातून रील बनविण्याच्या नादात असल्याने प्रशांत आणि हर्षवर्धन यांचे अचानक आलेल्या गाडीकडे अजिबात लक्ष नव्हते. त्यामुळे रेल्वे जवळ आल्यानंतर दोघांना जीव वाचविण्याची कोणतीच संधी मिळाली नाही. दोन्ही तरुणांचा धावत्या रेल्वेसाठी मृत्यू झाल्याची माहिती मिळताच पाळधी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरु केली. दोन्ही तरुणांच्या मृत्यूनंतर पाळधी गावावर शोककळा पसरली. समाज माध्यमावर प्रसिद्ध होण्यासाठी रील बनविण्याच्या नादात दोघांच्या जीवाशी आल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक : **हेमंत दिनेश अलोने.** ● सल्लागार संपादक : ✻ **शैलेंद्र माणिकराव तनपुरे** (✻ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ✆ : शहर- ०२५३-२५७५७१६, २५७२४०० ● नाशिकरोड कार्यालय :०२५३-२९४२२०३
● मालेगाव कार्यालय फोन: ०२५५४-२९९२०३ ● सिन्नर फोन: ०२५५१-२९९२०३, ● दिंडोरी फोन : ०२५५७-२२२८८८ ● निफाड फोन : ०२५५७-२९९६९६. ● Mail id : ceditor@deshdoot.com